अत्यंत महत्वांचे
कालमर्यादीत

क्रं.यजिप/आरोग्य/आस्था-१/वशि/ ९८६ /२०२२
यवतमाळ जिल्हा परिषद यवतमाळ
(आरोग्य विभाग)
यवतमाळ दिनांक२८ /०४/२०१७

प्रति,

१) गटविकास अधिकारी
पंचायत समिती ---------------- (सर्व)

२) तालुका आरोग्य अधिकारी
कार्यालय ------------------- (सर्व)

३) वैद्यकिय अधिकारी
प्राथमिक आरोग्य केंद --------------- (सर्व)

विषय :- **आरोग्य विभागाअंतर्गत सन -२०२२ चे सार्वत्रीक बदल्या बाबत तात्पुरती वास्तव्य सेवा जेष्ठता यादी प्रसिध्द करुन त्या बाबतचा अहवाल तात्काळ सादर करणे बाबत.**

संदर्भ :-१. शासन निर्णय ग्रामविकास विभाग मंत्रालय,मुंबई दि.१५ मे २०१४
२.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.यवतमाळ यांचे पत्र क्र.यजिप/साप्रवि/आस्था-४/कावि-५६६/२२ दि.२१.३.२०२२
३. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.यवतमाळ यांचे पत्र क्र.यजिप/साप्रवि/आस्था-४/कावि-८०८/२२ दि.२२.४.२०२२
४.अपल्या कार्यालयांकडुन आरोग्य कर्मचा-यांची प्राप्त झालेली माहिती.

* * *

उपरोक्त संदभीय विषयान्वये संदर्भीय क्र.१ चे शासन निर्णय आणि संदर्भ क्र.२ चे पत्रानुसार सर्वसाधारण बदल्या-२०२२ कार्यक्रम निश्चित करण्यात आलेला आहे. संदर्भ क्र.४ नुसार आपल्या कार्यालयाकडुन प्राप्त झालेल्या आरोग्य कर्मचा-यांच्या माहितीनुसार तयार करण्यात आलेली आहे.आरोग्य विभागाअंतर्गत सन -२०२२ चे सार्वत्रीक बदल्याच्या अनुषंगाने **१.विस्तार अधिकारी (आ.) २.प्रयोगशाळज्ञ वैज्ञनिक अधिकारी ३.औषध निर्माण अधिकारी ४.आरोगय सहा (पुरुष ) ५.आरोग्य सहा.(महीला) ६.आरोग्य सेवक (पु.) ७.आरोग्य सेवक (महीला) या ७ संवर्गाची तात्पुरती वास्तव्य सेवा जेष्ठता यादी आपल्या कडुंन प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे तयार करुन जिल्हा स्तरावरुन प्रसिध्द करण्यात येत आहे.**

सदरची जेष्ठता यादी आपले कार्यालयाच्या दर्शनी भागावर /नोटीस बोर्डावर तात्काळ प्रसिध्द करण्यात यावी. या सोबतच्या जेष्ठता यादया सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांना पुरविण्याची जबाबदारी सर्व तालुका आरोग्य अधिकारी यांची राहील तसेच जेष्ठता यादी संबधित सर्व कमचाऱ्यांच्या निदर्शनास आणुन त्यांची लेखी पोच घ्यावी. सदरच्या तात्पुरत्या जेष्ठता यादी बाबत काही कर्मचाऱ्यांचे आक्षेप/हरकती असल्यास संबधित कर्मचाऱ्यांकडुंन लेखी आक्षेप आवश्यक त्या कागदपत्रासह घेउन आक्षेपावर आपला स्पष्ट अभीप्राय नोंदवुन आपले शिफारसीसह खास दुता मार्फत या विभागाकडे **दिनांक ४/ ५/२०२२ पावेतो कार्यालयीन वेळेत सादर करावा.**आरोग्य कर्मचाऱ्यांनी त्यांचे लेखी आक्षेप या विभागाकडे परस्पर सादर करण्यात येवु नये या बाबत सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांना निर्देश दयावे .

त्याच प्रमाणे या पुवी आपल्या कार्यालयाकडुन सादर करण्यात आलेल्या बदलीच्या माहितीमध्ये किंवा प्रसिध्द करण्यात येत असलेल्या तात्पुरत्या जेष्ठता यादी मध्ये आपले कार्यालया कडुन किंवा या विभागाकडुन एखादया कर्मचाऱ्यांचे नाव अनावधानाने सुटल्यास त्या बाबत या विभागास तात्काळ कळविण्याचे करावे. प्रत्येक कर्मचाऱ्यांचे मुख्यालय जसे,प्रा.आ.केंद्र अंतर्गत उपकेंद्रे ,ता.आ.अधिकारी कार्यालय,पं.स.कार्यालयात कर्यरत असल्या बाबत प्रत्यक्ष मुख्यालयाचे नावासह कर्मचाऱ्यांच्या नावाची यादी या विभागास न चुकता सादर करावी,तसेच प्रत्येक संवर्ग निहाय जसे,वि.अ (आ),औ.नि.अ,आ.से (पु/म) आ.सहा.(पु/म),प्र.शा.वैज्ञानिक अधिकारी ईत्यादी मंजुर पदे,भरलेली पदे व रिक्त पदे (प्रत्यक्ष मुख्यालयाचे नावासह) ईत्यादी सविस्तर माहिती या विभागास तात्काळ सादर करावी.राज्य स्तरीय (state) चेआरोग्य कर्मचा-यांची माहीती सादर करण्यात येवु नये फक्त जि.प.स्तरावरील कर्मचा-यांची माहीती सादर करावी.

वर निर्देशीत केल्या प्रमाणे आक्षेप/हरकती असल्यास सर्व माहिती **या विभागास दिनांक ४/०५/२०२२ पावेतो खास दुता मार्फत कार्यालयीन वेळेत** न चुकता सादर करावी,मुदतीनंतर वरील प्रमाणे माहिती अथवा आक्षेप सादर केल्यास त्याचा विचार केल्या जाणार नाही व या बाबत होणाऱ्या पुढील कार्यवाहीस आपले कार्यालय सर्वस्वी जबाबदार राहील याची कृपया नोंद घ्यावी.

**सहपत्र :- तात्पुरती जेष्ठता यादी.**

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद यवतमाळ

**प्रतिलीपी :-**
१.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.यवतमाळ यांना माहिती करीता सविनय सादर.
२) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.) जि.प.यवतमाळ यांना माहिती करीता समादाराने सादर.

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद यवतमाळ